दै. देशोन्नती दि. 12/02/2022

# अर्धापूर महामार्ग पोलिसांमुळे बचावले चिमुकलीचे प्राण !

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ अर्धापूर शहरातील बिलाल नगर येथील एका चिमुकलीची प्रकृती चिंताजनक असताना अचानक गाडी बंद पडली व झटके येत होते. महामार्ग पोलिसांनी,तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि रुग्णालयात दाखल केले. चिमुकलीला वेळेवर उपचार मिळाल्याने प्राण वाचले. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



अर्धापूर शहरातील बिलाल नगर येथील शेख अनिस हे मुलीची प्रकृती बिघडली असता तिला उपचारासाठी नांदेड येथे घेऊन जात असताना अचानक त्यांची गाडी बंद पडली व ४ वर्षीय चिमुकली तसमिया फातेमा शेख हिला झटके येत होते. यावेळी महामार्गचे पोलीस निरीक्षक अरुण केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली येथील चालक दत्ता डुकरे, प्रभाकर करडेवाड,माणिक पेठे, बालाजी पोतदार, गणेश शेळके, राजीव धाडवे, वसंत शिनगारे आदींनी घटनास्थळी धाव घेतली. महामार्ग रूग्णवाहिकेने संबंधितांना तात्काळ नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असताना वेळेवर उपचार मिळाल्याने चिमुकलीला जीवदान मिळाले.

**तीन तास वाहतूक कोंडीनंतरही केले मदत कार्य**

बुधवार रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत भोकरफाटा ,दाभड, खडकुत अशी ३ ते ४ किमी ची वाहतूक कोंडी झाली असताना सदर परिस्थिती महामार्ग पोलिसांनी नियंत्रणात आणली मोठे परिश्रम घेतले असतानाही चिमुकलीसाठी पुन्हा पोलिसांनी मदत कार्य केले.